# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, 10 वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-400 051
दूरध्वनी : 26556799 फॅक्स : 26556805 ई.मेल :collectormsd@gmail.com

क्र.: सी/कार्या-2 आय/टे-8/कावि- श्वेता भट्/2019
दिनांक :11 /02/2020
002252

प्रति,
महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट थोरिटी,
पर्यावरण विभाग, 15 वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई- 32

**विषय :** Destruction of Mangroves at Yogayatan port, Mankhurdu

**संदर्भ :** 1. आपलेकडील पत्र क्र. Complaint 2019/CR-112/TC4 दि. 19/08/2019.
2. मा. विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मशा/कार्या-9/वने/कांदळवन-मानखुर्द/2019 दि. 23/10/2019.
3. उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/पु.उ./टे-1/त.क्र. 20/कावि-92/2019 दि. 23/01/2020.

उपरोक्त विषयांकित प्रकरणाबाबत संदर्भ क्र. 1 व 2 च्या पत्रान्वये श्रीमती श्वेता भट्ट यांचा दि.13/08/2019 रोजीचा तक्रार ई- मेल संदेश या कार्यालयास प्राप्त झाला असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार श्रीमती श्वेता भट्ट यांनी मौजे मानखुर्द ता. कुर्ला येथील योगायान पोर्ट या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत तक्रार दाखल केलेली आहे.

**सदर** तक्रारींच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून चौकशी अहवाल सादर करणेकामी कळविलेनूसार उपविभागीय अधिकारी, मुंबई पुर्व उपनगरे यांनी संदर्भ क्र. 3 च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारीमध्ये नमूद जागा ही मौजे, तुर्भे, ता. कुर्ला येथील न.भू.क्र. 508 मधील 23299 चौ.मी. जमीनीपैकी कांदळवन विरहित वितरणासाठी उपलबध्ध असलेलली जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जहाजदुरस्ती करिता शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र. जमीन-2604/1294/प्र.क्र.2023/ज-3 दि. 28/08/2007 व या कार्यालयाकडील दिनांक 04/02/2008 रोजीचे आदेशान्वये 30 वर्षाच्या भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी तहसिलदार कुर्ला यांनी दिनांक 12/12/2019 रोजी विषयांकित मिळकतीची स्थळपाहणी केलेली असून सदर स्थळपंहणी अहवालचे अवलोकन केले असता, सदर जागेवर पुर्व-पश्चिम असलेल्या खाडीमध्ये 102 X 12मी. लांबी-रुंदी असलेला एक जोड रस्ता तसेच समांतर 102 X 17 लांबी-रुंदी असलेला दुसरा जोडरस्ता खाडीपैकी जागेमध्ये असल्याचे दिसून येते. तसेच या दोन्ही जोड रस्त्याला जोडून दक्षिण- उत्तर सुमारे 153 X 18 लांबी- रुंदीची 1 जेट्टी दिसून आली. या जागेच्या दक्षिणेला पुर्व-पश्चिम असे पत्र्याचे कंपाऊंड



Scanned by CamScanner

असून खाडीमध्ये काही ठिकाणी कांदळवनाची झाडे असून ती जिवित आहेत. सदर जागेच्या पुर्वेस कांदळवनालगन पत्र्याचे कंपाऊंड, पश्चिमेस- रेल्वे ट्रॅक,उत्तरेस खाडी च दक्षिणेस योगायतन पोर्टचे ऑफिस व मोकळी जागा असल्याचे नमूद आहे.

सदर जागेवर जेट्टीच्या बांधकामामूळे सद ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या कांदळवनाच्या झाडाचा ऱ्हास झालेला नाही. तसेच सदर ठिकाणी बांधकाम करण्यासाठी आवश्यक त्या संबधित विभागाच्या आवश्यक त्या परवानग्या संबधित विभागाकडून घेण्यात आलेल्या आहेत, असे योगायतन पोर्टचे प्रतिनिधी श्री. राहूल महादेव सोमकुंवर यांनी त्यांचे जबाबात नमूद केलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे आपले उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगरे यांचा अहवाल व अनुषंगिक सहपत्रे आपले माहितीसाठी सविनय सादर.

/2/20

( वंदना गेवराईकर )

**निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**

**प्रत :1. मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीसाठी.**

2. श्रीमती श्वेता भट्ट, कॉन्झरवेशन क्शन ट्रस्ट, 5, सरकार भवन, 1 ला मजला, एल.बी.एस.रोड, नारायण नगर, घाटकोपर (प), मुंबई 86 माहितीसाठी

15/02/2020
Issued

Scanned by CamScanner